पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,(WSSO)

**पत्र क्र. पा.व.स्व.स.सं/पापुशा-२ /प्र. क्र. ५९/२०१८/२६०** **दिनांक: २७.०४.२०१८**

**<u>अति महत्वाचे</u>**

प्रति,

कार्यकारी अभियंता

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

जिल्हा परिषद (सर्व)

विषय: मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व पाणी पुरवठा योजनांचे wsso.in वर Online माहिती अचूकपणे भरण्यासाठी दि. ०७/०५/२०१८ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेबाबत.

महोदय,

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व पाणी पुरवठा योजनांची, wsso.in या वेबसाईटवर Online माहिती आपल्या कार्यालयामार्फत भरण्यात येते. तथापि, सदर भरण्यात आलेल्या माहितीमध्ये काही त्रुटी आढळतात व त्यामुळे संपुर्ण माहितीच्या आकडेवारीमध्ये त्रुटी आढळत.

मा. अपर मुख्य सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे मान्यतेनुसार, अचूकपणे Online माहिती भरण्याकरीता आपल्या कार्यालयातील **संबंधित शाखा अभियंता यांचेसाठी मित्रा, नाशिक येथे दि. ०७/०५/२०१८ रोजी सकाळी १०.०० वा एक दिवसाची अनिवासी कार्यशाळा आयोजित केली आहे.**

त्यानुसार, संबंधित शाखा अभियंतांनी सदर कार्यशाळेसाठी येताना, सोबत सर्व संबंधित योजनांची (नविन, पुनरुज्जिवित, देखभाल दुरूस्ती ) wsso.in वर असलेल्या format नुसार संपूर्ण माहिती Soft Copy द्वारे आणणे आवश्यक राहील.

या कार्यशाळेमध्ये माहिती भरताना येणाऱ्या अडचणी/ त्रुटी यावर चर्चा होईल तसेच अचूक माहिती भरण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येईल. मात्र, सदर कार्यशाळेनंतर मा. मंत्री महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्तरावर Online माहितीच गृहीत धरली जाणार आहे, याची कृपया नोंद असावी.

कृपया, आपल्या कार्यालयातील विषयांकीत प्रकरणी संबंधित शाखा अभियंतांना सदर कार्यशाळेसाठी उपस्थित राहणेबाबत सुचना देण्यात याव्यात ही विनंती.

आदराने,

आपला विश्वासु,

संचालक

**पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था**

C:\Users\Hp\Desktop\MRDWP MAIN\MRDWP सनियंत्रण\LETTER - ON Online सनियंत्रण.Docx

प्रत: १. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. मुख्य अभियंता तथा विशेष कार्यकारी अधिकारी, पापुवस्वि यांना माहितीसाठी सविनय सादर.
३. मा. मुख्य अभियंता,मजीप्रा प्रादेशिक विभाग सर्व यांना माहितीसाठी सविनय सादर.
४. श्री. कासलीवाल, मे. कॅसकॉम, नाशिक यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

C:\Users\Hp\Desktop\MRDWP MAIN\MRDWP सनियंत्रण\LETTER - ON Online सनियंत्रण.Docx